# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २३/०४/२०२४ (मंगळवार) सकाळ

---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
### वाहनासह एकुण २०३५००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
### नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक २२/०४/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे उमरेड हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधारांकडून माहीती मिळाली की, एक इसम हा त्याचे मालकीची टिप्पर क्र. एम एच.— ४९/ए टी— ६३०७ चा वापर करून मौजा मांगरूळ फाटा येथे रेती चोरी करून शासनाचा महसुल बुडवुन टिप्पर मध्ये लोड करून अवैधरीत्या वाहतूक करतो. अशा खात्रीशीर बातमीवरून उमरेड येथील मौजा मांगरूळ फाटा येथे नाकाबंदी करीत असताना टिप्पर क्र. एम एच.— ४९/ए टी— ६३०७ चा चालक **आरोपी नामे— मच्छोद्र नरहरी गीरी, वय २७ वर्ष, रा. प्लॉट नं. १०१ लाल शाळेजवळ भांडेवाडी पारडी नागपुर** यास स्टाफने थांबवून पाहणी केली असता टिप्पर वाहनामध्ये अंदाजे ०५ ब्रास रेती मिळून आल्याने सदर टिप्पर चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून एक पांढऱ्या निळया रंगाची टाटा कंपनीचा १० चक्का टिप्पर ज्याचा वाहन क्र. एम ४९ ए टी ६३०७ किंमती २००००००/— रू मध्ये ०५ ब्रास रेती प्रत्येकी ब्रास ५०००/— रू प्रमाणे २५०००/— असा एकुण २०३५००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे— १) मच्छोद्र नरहरी गीरी, वय २७ वर्ष, रा. प्लॉट नं. १०१ लाल शाळेजवळ भांडेवाडी पारडी नागपुर** याने २) **निलेश भाजीपालेरा खरबी चौक दिघोरी नागपुर** याचे सांगण्यावरून विनापरवाना रेती चोरी करून वाहतूक करताना मिळून आले. आरोपींविरुद्ध पोस्टे उमरेड येथे कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक किशोर शेरकी, पोना प्रणय बनाफर पोअं बालाजी बारगुले, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.




## सदोष मनुष्यवध

पोस्टे बेलाः— अंतर्गत मौजा बेला पांडे ले आउट नविन पाण्याच्या टाकी जवळ दिनांक १८/०४/२०२४ चे १७.०० वा. ते १७.३० वा. दरम्यान **मृतक** हे पांडे ले आउट बेला येथे पाण्याचा टाकीचे बांधकाम सुरू असतांना पांडे टाकीच्या गॅलरीतुन खाली पडले होते व त्यांना पुढील उपचाराकामी प्राथमीक आरोग्य केन्द्र बेला येथे प्राथमीक उपचाराकरीता आणले असता मा. वैदयकीय अधिकारी यांनी मेडीकल कॉलेज नागपुर येथे रेफर केल्याने जख्मी यास मेडीकल कॉलेज येथील अपघात विभागात नेले असता डॉक्टरांनी यातील जख्मी यास मयत घोषीत केले. पोस्टे. बेला येथे मर्ग क्र. १३/२४ कलम १७४ जाफौ. अन्वये दाखल करण्यात आले. मृतक यांची पत्नी रंजना उदाराम शहारे वय ३५ वर्ष, रा. बोरगाव ता. पवनी जि. भंडारा यांनी मृतकाचे काम करत असलेल्या ठिकाणी तिच्या पतीला सुरक्षेकरीता काम करतांना अपघात झाल्यास डोक्यात वापरण्यासाठी इजा होवु नये म्हणुन हेल्मेट, बेल्ट, जाळी, हया बाबीच्या ठेकेदार **आरोपी नामे— मारोती पंढरीजी मांडवे, वय ६० वर्ष, रा. नविन सुभेदार ले आउट नागपुर** याने जाळी किंवा काम करतांना खाली पडु नये म्हणुन कोणतीही जाळी वापलेली नव्हती.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रंजना उदाराम शहारे, वय ३५ वर्ष, रा. बोरगाव ता. पवनी जि. भंडारा यांचे रीपोर्ट वरून पोस्टे बेला येथे आरोपीविरूद्ध कलम ३०४ अ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद असुन आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर